पिंपरी चिंचवड महानगरपालिका, फ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक ९
सभावृत्तांत
(दि.१०/१२/२०१४ ची तहकुब सभा)

दिनांक:- ९/१/२०१५ वेळ.दुपारी २.३० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ प्रभाग समितीची दि. १०/१२/२०१४ ची मासिक तहकुब सभा शुक्रवार दि. ९/१/२०१५ रोजी दुपारी २.३० वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील "राजर्षी शाहु महाराज सभागृहात" आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

१. मा.वनिता एकनाथ थोरात सभापती
२. मा.पौर्णीमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
४. मा.अरुणा दिलीप भालेकर
५. मा.साधना रामदास जाधव
६. मा.राहुल गुलाब जाधव
७. मा.नारायण सदाशिव बहिरवाडे
८. मा.संगीता शाम पवार
९. मा.तानाजी विठठल खाडे
१० मा.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
११.मा.मासुळकर समीर मोरेश्वर

याशिवाय श्री.दिलीप गावडे क्षेत्रीय अधिकारी, श्री.विजय वाघमारे प्रशासन अधिकारी, श्री.संदेश चव्हाण कार्य. अभि.(वि), श्री.राजेंद्र राणे, उपअभियंता, श्री.डी.बी. सपताळे उपअभियंता, श्री.सी.सी.मोरे हॉर्टीकल्चर सुपरवायझर, श्री.बंडवल इ.एच., हॉर्टीकल्चर सुपरवायझर, श्री. गायकवाड हॉर्टीकल्चर सुपरवायझर, श्री.गायकवाड संदीप हॉर्टीकल्चर सहाय्यक, श्री.एस.एस.कुलकर्णी मुख्य आरोग्य निरिक्षक इ. अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा.सभापती यांनी सर्वांचे स्वागत करुन सभा सुरु करावी असे सांगितले.मागील सभेचा दि. १२/११/२०१४ च्या सभेचा सभावृत्तांत कार्यपत्रिका क्र.८ च्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आला.

ठराव क्र.४५ विषय क्र.१

दि.९/१/२०१५ विभाग:-

सुचक:- मा.पौर्णीमा रविंद्र (आप्पा) सोनवणे अनुमोदक:- मा.अरुणा दिलीप भालेकर

संदर्भ:- मा.पौर्णीमा सोनवणे व मा.अरुणा भालेकर यांचा दि.९/१/२०१५ चा प्रस्ताव

विषय:-नामकरण करणेबाबत

प्रभाग क्र.१ रुपीनगर-तळवडे प्रभागातील बुध्दविहारासमोर छोटे उद्यान विकसित करणेबाबत आयुक्तांनी निर्देश दिले आहेत. तसेच या उदयानाचे नामकरण **"कै.तुकाराम भागोजी भालेकर"** करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

----

ठराव क्र.४६ विषय क्र.२

दि.९/१/२०१५ विभाग:-

सुचक:- मा.पौर्णीमा रविंद्र (आप्पा) सोनवणे अनुमोदक:- मा.अरुणा दिलीप भालेकर

संदर्भ:-मा.पौर्णीमा सोनवणे व मा.अरुणा भालेकर यांचा दि.९/१/२०१५ चा प्रस्ताव

विषय:- नामकरण करणेबाबत

प्रभाग क्र.१ रुपीनगर-तळवडे प्रभागातील ठाकरे शाळा येथे नविन वाचनालय झाले असून सदर वाचनालयास **"डॉ.गोसावी सार्वजनिक वाचनालय"** असे नामकरण करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

----

ठराव क्र.४७ विषय क्र.३

दि.९/१/२०१५ विभाग:-

सुचक:-मा.पौर्णीमा रविंद्र (आप्पा) सोनवणे अनुमोदक:- मा.अरुणा दिलीप भालेकर

संदर्भ:- मा.पौर्णीमा सोनवणे व मा.अरुणा भालेकर यांचा दि.९/१/२०१५ चा प्रस्ताव

विषय:- सन २०१४ -२०१५ चे सुधारीत व सन २०१५-१६ चे मूळ अंदाजपत्रक छपाईकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.....

फ क्षेत्रीय कार्यालयाचे सन २०१४-१५ सुधारीत व सन २०१५-१६ चे मूळ अंदाजपत्रक तयार करुन प्रभाग समितीपुढे सादर करावयाचे आहे. त्याकामी अंदाजे २०० पानांचे एक या प्रमाणे ४० अंदाजपत्रक पुस्तकांची छपाई करणे आवश्यक असून, त्यासाठी अंदाजे रक्कम रुपये ४०,०००/- खर्च अपेक्षित आहे. सदर अंदाजपत्रकाचे पुस्तकांची तातडीची बाब म्हणून कोटेशन पध्दतीने दर मागवून करारनामा न करता छपाई करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

मा.सभापती यांनी सदरची सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(वनिता एकनाथ थोरात)
सभापती
फ क्षेत्रीय कार्यालय

जा.क्र.फक्षेका/सभा/कावि/१२/२०१५
दि. १२/०१/२०१५

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
फ क्षेत्रीय कार्यालय

प्रत:- सर्व संबंधित शाखा प्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, फ प्रभाग कार्यालय

कार्यपत्रिका क्रमांक १०

सभावृत्तांत

दिनांक:- ९/१/२०१५ वेळ.दुपारी ३.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ प्रभाग समितीची मासीक सभा दि. ९/१/२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील “राजर्षी शाहु महाराज सभागृहात” आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

१.मा.वनिता एकनाथ थोरात सभापती

२.मा.पौर्णीमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

३.मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ

४.मा.अरुणा दिलीप भालेकर

५.मा.साधना रामदास जाधव

६.मा.राहुल गुलाब जाधव

७.मा.नारायण सदाशिव बहिरवाडे

८.मा.संगीता शाम पवार

९.मा.तानाजी विठ्ठल खाडे

१०.मा.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

११.मा.मासुळकर समीर मोरेश्वर

याशिवाय श्री.दिलीप गावडे क्षेत्रीय अधिकारी, श्री.विजय वाघमारे प्रशासन अधिकारी, श्री.संदेश चव्हाण कार्य. अभि.(वि),श्री.राजेंद्र राणे, उप अभियंता, श्री.डी.बी.सपताळे, श्री.सी.सी.मोरे हॉर्टीकल्चर सुपरवायझर, श्री.बंडवल इ.एच.हॉर्टीकल्चर सुपरवायझर, श्री.गायकवाड संदीप हॉर्टीकल्चर सहाय्यक, श्री.एस.एस.कुलकर्णी मुख्य आरोग्य निरिक्षक इ. अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा.सभापती यांचे परवानगीने खालीलप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.१ डब्ल्यू सेक्टर ते मंडई पर्यंत असलेल्या रस्त्याला स्व.बाबुराव ठाकरे (गुरुजी) मार्ग असे नांव देणेबाबत

मा.मंदाकिनी ठाकरे व मा.समीर मासुळकर यांचा प्रस्ताव

विषय क्र.२ प्रभाग क्र.२८ मासुळकर कॉलनी येथील एकूण १८ सोसायटीमधील पंपशेडला टॅक्स न आकारणेबाबत
मा.मंदाकिनी ठाकरे व मा.पौर्णीमा सोनवणे यांचा प्रस्ताव

विषय क्र.३ प्रभाग क्र.९ संभाजी नगर येथे सिध्दीविनायक गणपती मंदीरा बाजुने बर्ड व्हॅलीकडे जाणा-या रस्त्यास कै. महादेव उर्फ आप्पा देसाई असे नामकरण करणेबाबत.
मा.नारायण बहिरवाडे व मा.राहुल जाधव यांचा प्रस्ताव

विषय क्र.४ ठराव क्र.३९ ठरावात उपसुचनेसह **"क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील राष्ट्रीय फेरीवाला धोरण मोहिमेपासुन अर्ज सादर न केलेल्या व्यावसायिकांना वंचीत रहावे लागले आहे. तरी त्याकामी पुन्हा नव्याने अर्ज मागवुन वंचित व्यावसायिकांना याबाबतचा हक्क मिळवुन दयावा"** अशी ठरावात दुरुस्ती करणेबाबत..
मा.सुरेश म्हेत्रे व मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव

सन्मा सदस्य/सदस्या यांची खालीलप्रमाणे चर्चा झाली.

**मा.नारायण बहिरवाडे:-**

१. शाहुनगर मध्ये स्ट्रीट लाईटचा प्रकाश पडत नाही, तक्रार केली की ठेकेदारांना फोन करा असे सांगितले जाते. फोन कोणास करावेत ? हे कळत नाही.
२. टेल्को रोड ते केएसबी चौक स्ट्रीट लाईट लागत नाही. संध्याकाळी ६.३० नंतर संपूर्ण अंधार पडतो अपघात होतात. बी.आर.टी रस्ता आहे.
३. शाहुनगर मध्ये टयूब लाईट बंद आहेत. तेथील थोडया थोडया फांदया काढा. संपूर्ण झाड काढु नका. बी.आर.टी रस्ता आहे.
४. मेंटेनन्स पथकाने शाहुनगर मध्ये संध्याकाळी फिरले पाहिजे.प्रभागामध्ये एवढा अंधार असतो की गाडयांचे नंबर सुध्दा दिसत नाही.
५. ट्रान्सफॉर्मर हलविला आहे. परंतु त्याचे फौंडेशन काढून टाकलेले नाही. त्यामुळे अपघाताचा शक्यता आहे. तो काढून टाकणेत यावा.
६. शाहुनगर मधील राजर्षी शाहु उदयान अंधारात आहे. लाईटची व्यवस्था नाही.
७. राजर्षी शाहु उद्यान येथे स्थापत्य विषयक कामे करणे
८.शाहुनगर येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र बांधणे
९.बहिरवाडे क्रिडांगणाचे पव्हेलियन वर शेड बांधणे
१०.शाहूनगर मधील सर्व रस्त्यांचे डांबरीकरण करणे
११.बहिरवाडे क्रिडांगणावर माती टाकून मैदानाचे सपाटीकरण करणे
१२.फुटपाथवर बसणा-या अनधिकृत भाजी विक्रेत्यांना बसण्यासाठी कायमस्वरुपी जागेची व्यवस्था करुन देणे

**मा.सुरेश म्हेत्रे :-** त्रिवेणीनगर येथे दिवे बंद असतात - करारनाम्याचा कालावधी ७ वर्षा ऐवजी कमी ठेवणेबाबत सुचना केल्या.

**मा. वनिता थोरात:-**

१.कोयनानगर मधील नामकरणाच्या ठरावाची अंमलबजावणी तातडीने करावी

**मा.मंदाकिनी ठाकरे**:- प्रभागात औषध फवारणी संपूर्ण ठिकाणी करणे. रस्त्याच्या कडेलाच फवारणी केली जाते.

**मा.तानाजी खाडे:-** ड्रेनेज चोकअप होतात. सदर कामे करणा-या ठेकेदाराची पुढील बिले थांबवावीत. ठेकेदारांची माणसे पैशाची मागणी करतात.

ठराव क्र.४८ विषय क्र.१

दि.९/१/२०१५ विभाग:-

सुचक:- मा.मंदाकिनी अर्जुन ठाकरे अनुमोदक:- मा.समीर मोरेश्वर मासुळकर

संदर्भ:- मा.मंदाकिनी ठाकरे व समीर मासुळकर यांचा दि. ९/१/२०१५ चा प्रस्ताव

विषय:- डब्ल्यू सेक्टर ते मंडई पर्यंत असलेल्या रस्त्याला स्व.बाबुराव ठाकरे (गुरुजी) मार्ग असे नांव देणे बाबत

विषय क्र.१ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.(विषय तहकूब)

------

ठराव क्र.४९ विषय क्र.२

दि.९/१/२०१५ विभाग:-

सुचक:- मा.मंदाकिनी अर्जुन ठाकरे अनुमोदक:- मा.पौर्णीमा रविंद्र सोनवणे

संदर्भ:- मा.मंदाकिनी ठाकरे व पौर्णीमा सोनवणे यांचा दि. ९/१/२०१५ चा प्रस्ताव

विषय:-प्रभाग क्र.२८ मासुळकर कॉलनी येथील एकूण १८ सोसायटीमधील पंप शेडला टॅक्स न आकारणेबाबत (मिळकत कर)

प्रभाग क्र.२८ मासुळकर कॉलनी येथे ४/५ बिल्डींग मिळुन सोसायटया बनविण्यात आलेल्या आहेत व सोसायटीमध्ये प्लॅट धारकांना पाणीपुरवठा करण्यासाठी पंप व मोटर बसविण्यात आलेल्या आहेत. सदर पंप पावसाळयात खराब होवू नयेत, इलेक्ट्रीक वायर व पंप भिजुन शॉक लागु नये यासाठी पंपशेड बनविण्यात आलेले आहेत. अशा शेडला महानगरपालिकेने (मिळकत कर) आकारु नये.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्र.५० विषय क्र.३

दि.९/१/२०१५ विभाग:-

सुचक:- मा.नारायण सदाशिव बहिरवाडे अनुमोदक:- मा.राहुल गुलाब जाधव

संदर्भ:- मा.नारायण बहिरवाडे व मा.राहुल जाधव यांचा दि.९/१/२०१५ चा प्रस्ताव

विषय:- प्रभाग क्र.९ संभाजीनगर येथे सिध्दीविनायक गणपती मंदीरा बाजुने बर्ड व्हॅली कडे जाणा-या रस्त्यास कै. महादेव उर्फ आप्पा देसाई असे नामकरण करणेबाबत

प्रभाग क्र.९ संभाजीनगर येथे सिध्दीविनायक गणपती मंदीरा बाजुने बर्ड व्हॅलीकडे जाणा-या रस्त्यास "कै. महादेव उर्फ आप्पा देसाई" असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. सदर सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता कार्यवाही करणेत यावी

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

------

ठराव क्र.५१ विषय क्र.४

दि.९/१/२०१५ विभाग:-

सुचक:- मा.सुरेश म्हेत्रे अनुमोदक:- मा.तानाजी खाडे

संदर्भ:- मा.सुरेश म्हेत्रे व मा.तानाजी खाडे यांचा यांचा दि.९/१/२०१५ चा प्रस्ताव

विषय:- ठराव क्र.३९ विषय क्र.१ फ क्षेत्रीय समितीचे विषयांकित ठरावाद्वारे राष्ट्रीय फेरीवाला धोरणांतर्गत काही उपसुचना व शिफारशी देवुन, ठराव पारीत करण्यात आला होता. परंतु या ठरावाच्या वृत्तांतामध्ये **"क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील या मोहिमेपासुन अर्ज सादर न केलेल्या व्यावसायिकांना वंचीत रहावे लागले आहे. तरी त्याकामी पुन्हा नव्याने अर्ज मागवुन वंचित व्यावसायिकांना याबाबतचा हक्क मिळवुन दयावा"** अशी ठरावात दुरुस्ती सुचविणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

-----

मा.सभापती यांनी सदरची सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(वनिता एकनाथ थोरात)
सभापती
फ क्षेत्रीय कार्यालय

जा.क्र.फक्षेका/सभा/कावि/१२/२०१४
दि. १२/०१/२०१५

सही/-
प्रशासन अधिकारी
तथा
सचिव (सभाशाखा)
फ क्षेत्रीय कार्यालय

प्रत:- सर्व संबंधित शाखा प्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना